ePaper

# शरद पवारांना सर्वात मोठा धक्का, 5 बडे नेते अजितदादांच्या गटात जाणार!

वर्ष - 8 । अंक - 270 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- केकेआरचं स्पर्धेतील आव्हान कायम!
- राहुलच्या सेलिब्रेशनवर शेट्टीचं वक्तव्य
- शालेय शुल्कविधेयकाला मंजुरी!
- भारत-पाकिस्तानमधील तणाव वाढला!


www.mahaenews.com | बुधवार, दि. 30 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## उच्चस्तरीय बैठकांपाठोपाठ बैठका

# तिन्ही दलांना मोकळीक, फक्त दहशतवाद संपवा!

## मोदींची मोहन भागवतांबरोबरही बैठक : पाकबरोबर युद्धाचा घेतला 'फायनल कॉल' !

। नवी दिल्ली / इस्लामाबाद
। प्रतिनिधी । महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीने संपूर्ण दिवस हा बैठकांचा होता. संपूर्ण दिवसभर त्यांनी पाकिस्तानबरोबर युद्ध सज्जतेचा आढावा घेतला. गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल आणि भारताच्या तिन्ही दलांचे प्रमुख यांच्याशी चर्चेसाठी बैठकाच्या बैठका पार पडल्या. सरसंघचालक मोहन भागवत यांच्याशीही चर्चा करून मोदींनी त्यांना युद्धजन्य परिस्थितीची कल्पना दिली.**





**गृहमंत्री, संरक्षणमंत्री, तिन्ही दलांचे प्रमुख,अजित डोवलसुद्धा बैठकीला उपस्थित !**



### दहशतवाद उद्ध्वस्त करा

भारताची युद्धाची सर्व तयारी झालेली आहे. भारताच्या तिन्ही दलांच्या प्रमुखांना मोदी सरकारने पूर्णपणे मोकळीक दिली असून पाकिस्तान आणि दहशतवाद्यांची कोंडी करून दहशतवाद उद्ध्वस्त करण्यासाठी त्यांना पूर्ण मोकळीक दिली आहे.

### पाकड्यांची पूर्णपणे घबराट

भारत सरकारच्या हालचालींवर पाकिस्तानच्या शरीफ सरकारची बारीक नजर असून त्यांची पूर्णपणे घबराट उडाली आहे. शरीफ यांनी बोलावलेल्या विशेष बैठकीमध्ये अनेकांनी नरेंद्र मोदी सरकारचे गुणगान केल्यामुळे तणावात भरच पडली. त्यांच्या काही मंत्र्यांनी नरेंद्र मोदी सरकारने भारताला कसे चांगल्या परिस्थितीत हाताळले आहे, याचा पाढाच वाचला.

### खायला नाही अन्न, म्हणे अणुबॉम्ब टाका

पाकिस्तानमधील बैठकीत त्यांच्या एका उच्च अधिकाऱ्याने शरीफ सरकारमधील सर्व मंत्र्यांना सुनावले आहे. आपल्या पाकिस्तानी नागरिकांना खायला अन्न नाही, तीन दिवस पुरेल एवढा दारूगोळा आहे आणि म्हणे भारतावर अणुबॉम्ब टाका..या सर्व वल्गना आता बास झाल्या. निमूटपणे केलेल्या कर्माची फळे भोगा, असे त्यांच्याच मंत्र्याने सुनावले आहे.

### नरेंद्र मोदी यांच्या बैठकांचा सिलसिला..

पहलगाममधील हल्ल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत मोठ्या घडामोडी घडत आहेत. दरम्यान, मंगळवारी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी, तिन्ही दलाचे प्रमुख एकत्र आले. महत्त्वाच्या मुद्द्यावर या बैठकीत चर्चा झाली. मोदी यांच्या अध्यक्षतेखील महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीला भारताचे भूदल, नौदल आणि वायुदल अशा तिन्ही दलाचे प्रमुख अपस्थित होते. राजनाथ सिंह तसेच अजित डोवल हेदेखील हजर होते. यावेळी पहलगाममधील हल्ला, भारतीय सेनेची तयारी या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली.

### सेनेकडून युद्धाभ्यास..

भारतीय सेनेकडून युद्धाभ्यास चालू आहे. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोणत्याही क्षणी आदेश मिळाला तर भारताची तिन्ही दले पाकिस्तान वर तुटून पडण्याच्या तयारीत असल्याची ग्वाही या बैठकांमधून देण्यात आली. पाकिस्तानची चौफेर कोंडी करण्यासाठी आणि दहशतवाद निपटून काढण्यासाठी तिन्ही दलांना मोकळीक देण्यात आली आहे.

### पाकिस्तानची खुमखुमी कायम

भारताने हल्ला केल्यास आम्ही त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा पवित्रा पाकिस्तानने घेतलेला आहे. त्यामुळे दोन्ही देश युद्धासाठी सज्ज असल्याचे सध्या चित्र आहे. दुसरीकडे पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ यांनीदेखील भारत-पाकिस्तान युद्धासंबंधी मोठे विधान केले आहे. आगामी चार दिवसांत युद्ध सुरू होण्याची शक्यता आहे, असा दावाच त्यांनी केला आहे.

ePaper

**शरद पवारांना सर्वात मोठा धक्का, 5 बडे नेते अजितदादांच्या गटात जाणार!**

|| वर्ष - 8 | अंक - 270 || UDYAM-MH-26-0158827 ||



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- केकेआरचं स्पर्धेतील आव्हान कायम!
- राहुलच्या सेलिब्रेशनवर शेट्टीचं वक्तव्य
- शालेय शुल्कविधेयकाला मंजुरी!
- भारत-पाकिस्तानमधील तणाव वाढला!


www.mahaenews.com | बुधवार, दि. 30 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# टोलमाफी ते पीकविमा योजना

# मंत्रिमंडळात सरकारचे सर्वात मोठे निर्णय!

## सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन आणि बंदरे विभाग यासारख्या महत्त्वाच्या विभागांचा समावेश

| मुंबई / पुणे / बीड | प्रतिनिधी | महाईन्यूज

**राज्य मंत्रिमंडळाचीमहत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सरकारने वेगवेगळ्या खात्यांशी निगडित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यात सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन आणि बंदरे विभाग यासारख्या महत्त्वाच्या विभागांचा समावेश आहे. सरकारने याच मंत्रिमडळाच्या बैठकीत सुधारित पीकविमा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सोबतच सरकारने ईलेक्ट्रिक व्हेइकल्सचा वापर वाढावा यासाठी काही पावलं उचलली आहेत. सरकारच्या नव्या निर्णयाअंतर्गत इलेक्ट्रिक व्हेइकल्सना काही टोलनाक्यांवर टोलमाफी दिली जाणार आहे. सरकारने असे एकूण 11 वेगवेगळे निर्णय घेतले आहेत.**



### महाराष्ट्राचे 3 कंपन्यांशी 57 हजार कोटींचे करार

महाराष्ट्रासाठी एक चांगली बातमी समोर आली आहे. राज्याच्या जलसंपदा विभागाचे तीन कंपन्यांसोबत एकूण 9 मोठे करार झाले आहेत. या कंपन्यांच्या माध्यमातून आता महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक केली जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार राज्याच्या जलसंपदा विभागाने एकूण तीन कंपन्यांसोबत 9 करार केले आहेत. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. या 9 करारांमुळे राज्यात 8 हजार 905 मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. काररातून एकूण 57 हजार 760 कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. विशेष म्हणजे तीन कंपन्यांसोबत केलेल्या या करारातून महाराष्ट्रात साधारण 9 हजार 200 नवे रोजगार निर्माण होणार आहेत. महाजेनको, एमआरईएल, आवादा या तीन कंपन्यांसोबत हे करार झाले आहेत.

### निर्णय क्रमांक 1

टेमघर प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे येथील उर्वरित कामे व धरण गळती प्रतिबंधक कामासाठी रु.488.53 कोटी किमतीच्या सुधारित खर्चाला प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा)

### निर्णय क्रमांक 2

मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम, 1951 अंतर्गत महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध नियम, 1964 मधील नियम 27(ब) (3) मधील तरतूदीमध्ये सुधारणा. भिक्षागृहातील व्यक्तींना 5 रुपये ऐवजी आता 40 रुपये प्रतिदिन. 1964 नंतर प्रथमच बदल (महिला व बाल विकास)

### निर्णय क्रमांक 3

PM-YASASVI या एकछत्री योजनेअंतर्गत ओ.बी.सी., ई.बी.सी. व डी.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन 2021-22 ते 2025-26 या वर्षांकरिता निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याचा निर्णय. (इतर मागास बहुजन कल्याण)

### निर्णय क्रमांक 4

हडपसर ते यवत राज्य मार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग व अस्तित्वातील रस्त्याचे सहापदरी बांधकाम करण्यास मान्यता. 5262.36 कोटी रुपयांचा मार्ग (सार्वजनिक बांधकाम)

### निर्णय क्रमांक 5

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत महा इनविट (पायाभूत सुविधा गुंतवणूक संस्था) Maha InvIT (Infrastructure Investment Trust) स्थापन करण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम)

### निर्णय क्रमांक 6

महाराष्ट्र राज्यात जहाजबांधणी व जहाजदुरुस्ती सुविधा (Shipyard) आणि जहाज पुनर्वापर सुविधा (Ship Recycling) विकसित करण्याबाबतच्या धोरणास मान्यता. (परिवहन व बंदरे)

### निर्णय क्रमांक 7

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२५ ला मान्यता. (परिवहन व बंदरे).या निर्णयाअंतर्गत पॅसेंजर ईव्हीला सबसिडी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासह ईव्हीला काही टोल नाक्यावर टोलमाफी देण्याचा ही निर्णय सरकारने घेतला आहे. मात्र या या नव्या धोरणाचं नवं प्रारूप काय असेल हे अद्याप समोर येणे बाकी आहे.

### निर्णय क्रमांक 8

ॲप बेस वाहनांसाठी समुच्चयक (Aggregator) धोरण. (परिवहन व बंदरे)

### निर्णय क्रमांक 9

सर्वसमावेशक पीकविमा योजनेत बदल करून केंद्र सरकारच्या अनिवार्य जोखीम बाबीवर आधारित पीकविमा योजना राबवणार तसेच कृषि क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषि पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी योजना राबविणार (कृषी)

### निर्णय क्रमांक 10

आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजबांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय (इतर मागास बहुजन कल्याण)

### निर्णय क्रमांक 11

11. म. रा. इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा 10 लाख रुपयांवरून 15 लाख रुपये करण्याचा निर्णय (इतर मागास बहुजन कल्याण)

# सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाचे उद्घाटन!

## नागरिकांना मिळणार वाहतूक कोंडीतून दिलासा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील (सिंहगड रस्ता) पुणे महापालिकेच्या वतीने विठ्ठलवाडी ते फन टाइम चित्रपटगृहादरम्यान उभारण्यात आलेला उड्डाणपूल उद्या गुरुवारी (१ मे) वाहतुकीसाठी खुला होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या उड्डाणपुलाचे उद्घाटन होणार आहे. सोमवारी सिंहगड रस्त्यावर मोठ्या कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागला होता.**



सिंहगड रस्त्यावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या वतीने हा उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या पुलामुळे वडगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांची कोंडीतून सुटका होणार आहे. पुलाचे काम २१ सप्टेंबर २०२१ मध्ये सुरू करण्यात आले होते. अडीच किलोमीटर लांबीचा हा पूल आहे. हा उड्डाणपूल मार्चअखेर, तर माणिकबाग ते विठ्ठलवाडीदरम्यान उड्डाणपूल डिसेंबरअखेर वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रशासनाने जाहीर केले होते. विठ्ठलवाडी ते फन टाइम चित्रपटगृहादरम्यानचा उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊनही केवळ नेत्यांची वेळ मिळत नसल्याने उद्घाटन केले जात नव्हते. या भागात दररोज सकाळी आणि संध्याकाळी वाहतुकीची गंभीर समस्या असतानाही पुलाचा वापर नागरिकांना करता येत नव्हता.काम पूर्ण होऊनही उड्डाणपूल खुला केला जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. या भागात सातत्याने वाहतूक कोंडी होते. सोमवारी सकाळीही या भागात मोठी वाहतूक कोंडी झाली होती. राजाराम पूल वाहतुकीसाठी काही काळ बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे येथे चार किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.सिंहगड रस्त्यावर उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे उद्घाटन १ मे रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते केले जाणार आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी यासाठी वेळ दिली असून, महापालिकेला तसे कळविण्यात आले आहे. त्यानुसार उद्घाटनाची तयारी सुरू करण्यात आली आहे. सिंहगड रस्त्यावर उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे उद्घाटन १ मे रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सकाळी सात वाजता होणार आहे. या कार्यक्रमासाठी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेत महाराष्ट्र दिनानिमित्त होणारे ध्वजारोहण या वर्षी सातऐवजी ६ वाजून २५ मिनिटांनी होणार आहे. महापालिकेच्या इतिहासामध्ये प्रथमच इतक्या लवकर ध्वजारोहण होणार आहे. सिंहगड रस्त्यावरील वाहतूककोंडी या पुलामुळे वडगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांची कोंडीतून सुटका होणार आहे. पुलाचे काम २१ सप्टेंबर २०२१ मध्ये सुरू करण्यात आले होते.

### 6 वाजून 25 मिनिटांनी उद्घाटन

अडीच किलोमीटर लांबीचा हा पूल आहे. हा उड्डाणपूल मार्चअखेर, तर माणिकबाग ते विठ्ठलवाडीदरम्यान उड्डाणपूल डिसेंबरअखेर वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रशासनाने जाहीर केले होते. विठ्ठलवाडी ते फन टाइम चित्रपटगृहादरम्यानचा उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊनही केवळ नेत्यांची वेळ मिळत नसल्याने उद्घाटन केले जात नव्हते. या भागात दररोज सकाळी आणि संध्याकाळी वाहतुकीची गंभीर समस्या असतानाही पुलाचा वापर नागरिकांना करता येत नव्हता.काम पूर्ण होऊनही उड्डाणपूल खुला केला जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. या भागात सातत्याने वाहतूक कोंडी होते. सोमवारी सकाळीही या भागात मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

# गवताच्या आगीत सात वीजवाहिन्या जळाल्या

## देहूगाव परिसरात औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे येथे गवताच्या आगीत महावितरणच्या २२ केव्ही आणि ३३ केव्ही क्षमतेच्या सात वीजवाहिन्या जळाल्याने तळवडे पाणीपुरवठा योजनेसह तळवडे एमआयडीसी आणि औद्योगिक परिसरातील सुमारे साडेचार हजार औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा मंगळवारी दुपारी पावणेचारच्या सुमारास खंडित झाला. यातील सुमारे १८०० उद्योगांना पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. तर, उर्वरित २७०० उद्योगांसह पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा युद्धपातळीवर काम करून रात्री पूर्ववत करण्यात आला.**



चिंचोली गावातील अडीच हजार घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठादेखील खंडित झाला होता. मात्र, पर्यायी व्यवस्थेतून सायंकाळी सहा वाजेपर्यंत या सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. आगीमुळे वीजपुरवठा खंडित होण्याचा गेल्या दोन महिन्यांतील हा नववा प्रकार आहे.तळवडे येथील डोंगरावरील वाळलेल्या गवताला मंगळवारी दुपारच्या सुमारास आग लागली. ही आग सर्वत्र पसरत गेली. डोंगराशेजारी असलेल्या एका ओढ्याच्या कडेपर्यंत ही आग आली. त्याच ठिकाणी असलेल्या महावितरणच्या २२ केव्ही क्षमतेच्या चार आणि ३३ केव्ही क्षमतेच्या तीन वीजवाहिन्या या आगीत जळाल्या. त्यामुळे तळवडे एमआयडीसी, औद्योगिक परिसर तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या तळवडे पाणीपुरवठा योजनेसह सुमारे साडेचार हजार लघु आणि उच्चदाब औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. या सर्व परिसराला नियमित वीजपुरवठा करणाऱ्या चार आणि पर्यायी वीजपुरवठ्यासाठी अतिरिक्त असलेल्या तीन वीजवाहिन्या जळाल्या. त्यामुळे वीजपुरवठ्याची पर्यायी सोय उपलब्ध होऊ शकली नाही. मात्र इतर पर्यायी व्यवस्थेतून सुमारे १८०० औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा दोन तासांमध्ये टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आला.भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांनी तीन कंत्राटदार आणि सहा जॉईंटर यांना पाचारण करून एकाचवेळी सर्व वीजवाहिन्यांचे दुरुस्ती काम सुरू केले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता किरण सरोदे, सहायक अभियंता ऋषिकेश बनसोडे यांनी घटनास्थळी भेट देऊन या कामाला वेग दिला. रात्री दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित २७०० औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात आला.दरम्यान, या आगीमुळे देहूगाव, चिंचोली गावातील अडीच हजार घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठादेखील खंडित झाला होता. मात्र, पर्यायी व्यवस्थेतून सायंकाळी सहा वाजेपर्यंत या सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. आगीमुळे वीजपुरवठा खंडित होण्याचा गेल्या दोन महिन्यांतील हा नववा प्रकार आहे.तळवडे येथील डोंगरावरील वाळलेल्या गवताला मंगळवारी दुपारच्या सुमारास आग लागली. ही आग सर्वत्र पसरत गेली. डोंगराशेजारी असलेल्या एका ओढ्याच्या कडेपर्यंत ही आग आली. त्याच ठिकाणी असलेल्या महावितरणच्या २२ केव्ही क्षमतेच्या चार आणि ३३ केव्ही क्षमतेच्या तीन वीजवाहिन्या या आगीत जळाल्या.

### औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

तळवडे एमआयडीसी, औद्योगिक परिसर तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या तळवडे पाणीपुरवठा योजनेसह सुमारे साडेचार हजार लघु आणि उच्चदाब औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. या सर्व परिसराला नियमित वीजपुरवठा करणाऱ्या चार आणि पर्यायी वीजपुरवठ्यासाठी अतिरिक्त असलेल्या तीन वीजवाहिन्या जळाल्या.

## पायलट प्रकल्पाची निगडी येथे सुरुवात

# सुरक्षित आणि ट्रॅफिक मुक्त रस्त्यांसाठी 'हरित सेतू'!

### लोकाभिमुख रस्त्यांच्या विकासासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचा अभिनव उपक्रम



। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराचा शाश्वत आणि सर्वसामावेशक विकास करण्यासाठी सुरक्षित आणि ट्रॅफिक मुक्त रस्त्यांची संकल्पना प्रत्यक्षात राबविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने पुढाकार घेतला असून, या अंतर्गत हरित सेतू या पायलट प्रकल्पाची निगडी येथे सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमामध्ये सायकलिंग, पायी चालण्यावर भर दिला जाईल. शहरातील प्रमुख बाजारपेठा, गर्दीची ठिकाणी आणि शाळा जवळ अर्ज सेतू प्रकल्प राबविण्यात येईल.**

महापालिकेच्या नव्याने स्थापन केलेल्या शहरी दळणवळण विभागाच्या माध्यमातून हरित सेतू उपक्रम राबविला जाणार आहे. हरीत सेतु उपक्रम भविष्यात भक्ति शक्ती मेट्रो स्टेशनसाठी व आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ करण्यात येणार आहे

### तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

ग्लोबल डिझाइनिंग सिटीज इनिशिएटिव्ह (GDCI) कडून तज्ञ प्रतिनिधी मंडळाने या भागास भेट दिली. यामध्ये तांत्रिक कार्यशाळा, डिझाईन वर्कशॉप आणि प्रत्यक्ष सहभागाच्या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या सहकार्यात्मक दृष्टिकोनातून लोकाभिमुख रस्त्यांचे डिझाईन करणेसाठी नवनवीन कल्पना आणि तज्ञ मार्गदर्शन महापालिकेस लाभले. या प्रकल्पाच्या डिझाईनचे नेतृत्व प्रसन्न देसाई आर्किटेक्ट्स (PDA) यांनी केले असून, आशिक जैन यांचे सहकार्य त्यामध्ये त्यांना लाभले आहे. ITDP इंडिया कडून शाश्वत वाहतूक नियोजन तज्ञ मार्गदर्शन मिळाले असून संस्कृती मेनन (CEE) यांनी स्थानिक समुदायाशी संवाद साधण्यास पाठिंबा दिला आहे.

### असा असेल हरित सेतू

सध्या प्रायोगिक तत्वावर सुमारे १०० मीटर लांबीचा रस्ता विकसित करण्यात आला आहे. यामध्ये पायी चालणे, सायकलिंग आणि पावसाचे पाणी व्यवस्थापन यासंबंधी असलेल्या नव्या शहरी धोरणांचा समावेश आहे. त्यामध्ये वृक्षसंवर्धनावर भर देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधून सुसंगतता साधण्यावर भर दिला जात आहे. रंगीबेरंगी भित्तीचित्रे, सार्वजनिक जागांचा विकास आणि विचारपूर्वक केलेली रस्त्यांची रचना यामुळे नागरिकांनी आता या सकारात्मक बदलांचे स्वागत केले आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिका शाश्वत शहरी वाहतूक आणि सर्वसमावेशक शहरी विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आहे. हरीत सेतु उपक्रमाच्या माध्यमातून शहरात सुरक्षित, निरोगी, आणि सर्व वयाच्या आणि क्षमतेच्या नागरिकांसाठी समावेशक रस्त्यांची निर्मिती करण्यात येत आहे.
>
> **- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक

### पंधरा मिनिटे शहरासाठी

हरित सेतू हा उपक्रम मुख्यत्वे शहराच्या रहदारीच्या रस्त्यांवरील गर्दी कमी करून हे रस्ते नागरिकांना सुरक्षित व्हावेत असा आहे. यासाठी निवडण्यात आलेल्या रस्त्यांवर सायकल किंवा पायी चालता येणार आहे. कालांतराने याचा शहरभर विस्तार करण्यात येणार आहे.सध्या शाळा बाजारपेठ आणि वाहतूक केंद्रे हरित सेतूच्या माध्यमातून ट्राफिक मुक्त आणि सुरक्षित करण्यात येणार आहे.

---

## तळवडे एमआयडीसीसह देहूगाव अंधारात!

### 4500 हजार उद्योग ठप्प; नागरिकांचे भर उन्हाळ्यात वीज पुरवठ्याअभावी हाल

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे येथे गवताच्या आगीत महावितरणच्या २२ केव्ही व ३३ केव्ही क्षमतेच्या तब्बल ७ वीजवाहिन्या जळाल्या. परिणामी तळवडे पाणीपुरवठा योजनेसह तळवडे एमआयडीसी व इंडस्ट्रीयल परिसरातील सुमारे ४५०० छोट्या मोठ्या उद्योग समूहांचा वीजपुरवठा मंगळवारी (दि. २९) दुपारी पावणे चारच्या सुमारास खंडित झाला. यातील सुमारे १८०० उद्योगांना पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरु करण्यात आला आहे. तर उर्वरित २७०० उद्योगांसह पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा महावितरण कडून टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात आला. त्यासाठी महावितरणकडून दुरुस्ती काम युद्धपातळीवर करण्यात आले.**



दरम्यान, या आगीमुळे देहूगाव, चिंचोली गावातील २५०० घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा देखील खंडित झाला होता. मात्र पर्यायी व्यवस्थेतून सायंकाळी सहा वाजेपर्यंत या सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. आगीमुळे वीजपुरवठा खंडित होण्याचा गेल्या २ महिन्यांतील हा नववा प्रकार आहे.

महावितरणने दिलेल्या माहितीनुसार तळवडे येथील डोंगरावरील वाळलेल्या गवताला मंगळवारी दुपारच्या सुमारास आग लागली. ही आग सर्वत्र पसरत गेली.

डोंगराशेजारी असलेल्या एका ओढ्याच्या कडेपर्यंत ही आग आली. त्याच ठिकाणी असलेल्या महावितरणच्या २२ केव्ही क्षमतेच्या ४ आणि ३३ केव्ही क्षमतेच्या ३ वीजवाहिन्या या आगीत जळाल्या. त्यामुळे तळवडे एमआयडीसी, इंडस्ट्रीयल परिसर तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तळवडे पाणीपुरवठा योजनेसह सुमारे ४५०० लघु व उच्चदाब औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला.

या सर्व परिसराला नियमित वीजपुरवठा करणाऱ्या ४ आणि पर्यायी वीजपुरवठ्यासाठी अतिरिक्त असलेल्या ३ वीजवाहिन्या जळाल्या. त्यामुळे वीजपुरवठ्याची पर्यायी सोय उपलब्ध होऊ शकली नाही. मात्र इतर पर्यायी व्यवस्थेतून सुमारे १८०० औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा दोन तासांमध्ये टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आला.

> तीन कंत्राटदार व सहा जॉईंटर यांना पाचारण करून एकाचवेळी सर्व वीजवाहिन्यांचे दुरुस्ती काम सुरु केले आहे.अतिरिक्त कार्यकारी अभियंता किरण सरोदे, सहायक अभियंता ऋषिकेश बनसोडे यांनी घटनास्थळी भेट देऊन या कामाला वेग दिला आहे. टप्प्याटप्प्याने औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येणार आहे.
>
> **- अतुल देवकर** कार्यकारी अभियंता



## भूमिका

# पाणी का पुरत नाही?

**उन्हाळा संपायला अजून जवळपास दीड महिना शिल्लक असताना राज्याचा सरासरी पाणीसाठा ४० टक्क्यांखाली गेला आहे. हल्ली जूनमध्ये सगळीकडे समान आणि सरासरीइतका पाऊस होतोच असे नाही.**

हा पाणीसाठा दोन-अडीच महिने पुरवणे क्रमप्राप्त. आता हा साठा गेल्या वर्षीपेक्षा बरा, पण तरी तो पुरत नाही, हीच मुळात रड. कारण, राज्यात ठिकठिकाणी वाढलेल्या टँकरच्या फेऱ्या आणि अनेक शहरांमध्ये दररोज नळाने होऊच न शकणारा पाणीपुरवठा ही वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही. 'लोकसत्ता'ने २७ एप्रिलला यावर प्रकाश टाकणारे वृत्त प्रकाशित केले. पाण्याची ही बोंब केवळ ऊन जास्त असल्याने, बाष्पीभवन जास्त होऊन झाली आहे, असे मानण्याचे कारण नाही. अर्थात तापमानवाढीचा परिणाम यावर आहेच, पण तापमानवाढ होणार हे गृहीत धरून न केलेल्या नियोजनाचा परिणाम जास्त आहे, हे नक्की. राज्यातील जनता दर उन्हाळ्यात तहानलेली कशी राहते, या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर व्यवस्थेने कधी तरी दिले पाहिजे. 'टँकर पुरवले जात आहेत,' हे त्यावरचे एक नेहमीचे छापील उत्तर. पण, मग 'नल से जल' वगैरे घोषणांचे काय झाले, असे त्यावर विचारले, तर? त्याचे समाधानकारक



उत्तर ना व्यवस्थेकडे आहे, ना राज्यकर्त्यांकडे. मनमाडमध्ये १३ दिवसांनी एकदा, अकोला, सोलापुरात पाच-सहा दिवसांआड आणि पिंपरी-चिंचवडमध्ये गेली सहा वर्षे दिवसाआड पाणी, अशी नळयोजनांची स्थिती अजूनही आहे. ही केवळ प्रातिनिधिक उदाहरणे. महाराष्ट्रातील बऱ्याच शहरांत थोड्या फार फरकाने हीच स्थिती आहे. नळाला रोज पाणी येणाऱ्या पुण्यासारख्या 'पाणीदार' शहराला आजघडीला ४२ हजार टँकर पाणी पुरवतात, यापेक्षा पाणी नियोजनाची दयनीय स्थिती काय असू शकते? नागरिकांना शुद्ध पाणी देण्यासाठी बांधलेल्या जलशुद्धीकरण प्रकल्पांतून पाणी उचलून ते नागरिकांनाच दामदुप्पट दराने विकणारी टँकर लॉबी आणि त्यांचे राजकीय आश्रयदाते, हा तर आणखी एक वेगळा विषय.राज्यात गेल्या वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. नेहमी ९९४.५ मिलिमीटर पडतो, गेल्या वर्षी १२५२.१ मि.मी. पडला, म्हणजे सरासरीपेक्षा अडीचशे मि.मी.हून अधिक. कारण पावसाचा प्रत्येक थेंब वाचविण्याएवढी क्षमता आपण निर्माण करू शकलेलो नाही. धरणे बांधायला आता मर्यादा आहेत, आणि आहेत त्या धरणांत पाणी साठविण्यालाही. हवामानतज्ज्ञांनी दीड दशकापूर्वीपासून हे सांगायला सुरुवात केली होती की, इथून पुढे कमी वेळात अधिक पाऊस, असेच पावसाचे वैशिष्ट्य असणार आहे. ते तसेच आहे, हे दिसते आहे. त्यामुळे साहजिकच कमी वेळात पडणारे भरपूर पाणी साठवायचे कसे आणि कुठे, याचे स्वतंत्र नियोजन आवश्यक आहे. मात्र, त्याचे ठळक प्रतिबिंब नगर नियोजनात दिसत नाही. परिणामी, शहरांना पाणीपुरवठा करणारी धरणे, तलाव पूर्ण भरले, की त्यानंतर पडलेल्या पावसावर शब्दश: 'पाणी' सोडून द्यावे लागते. भूजलावर मदार ठेवायची, तर त्यासाठी आधी जमिनीत पाणी मुरले पाहिजे. इथे शहरोशहरी ओढा, नाल्यांचे प्रवाह वळवलेले, नदीला 'सुधारा'च्या नावाखाली हवे तसे वाकवलेले आणि रस्त्यांचे नको इतके काँक्रीटीकरण केलेले. अशाने कसे मुरणार जमिनीत पाणी? जमिनीची चाळण होईल, इतक्या विंधनविहिरी शहराशहरांतून खणल्या गेल्या. पण उन्हाळ्यापर्यंत त्यातील पाणीही खोल तळाला जाते, ही वस्तुस्थिती. नळाचे पाणी न पुरण्याचे एक कारण पाण्याचा अपव्यय हेही. पिण्याचे पाणी सर्रास गाड्या, घरे, बागा धुवायला वापरले, तर कसे पुरणार पाणी? पुनर्वापर हा त्यावरचा उपाय. पण, सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प कार्यान्वित व्हायलाच इतका वेळ खातात, की त्यामुळे त्यावरही मर्यादा. या सगळ्यांतून ऐन उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष तेवढे वाढत जाते. राज्यातील निम्मी लोकसंख्या ५०० शहरांत राहाते आहे आणि शहरांवरील लोकसंख्येचा हा ताण वाढतोच आहे.बांधकामे करणारे व्यावसायिक ग्राहकांना नव्या इमारतींत महापालिकेच्या पाणीपुरवठ्याची खात्री देऊ शकत नाहीत, कारण महापालिकाच व्यावसायिकांना तशी हमी देऊ शकत नाहीत.

## संपादकीय »

# औदार्याने अडचण!

***जम्मू-काश्मीर विधानसभेत ओमर यांनी साश्रुनयनांनी केलेले निवेदन; ज्यांच्या हाती अधिकार आहेत त्यांच्या अपयशाची व्याप्ती दाखवून देते..***

सध्याच्या कूपमंडुकीकालात जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचे कौतुक करावे तेवढे कमीच. मुख्यमंत्री ओमर हे आपले तीर्थरूप खुशालचेंडू फारुख अब्दुल्ला यांच्याप्रमाणे खुशमिजाज नाहीत; हे त्यांच्या कौतुकाच्या अनेक कारणांपैकी एक कारण! एरवी अनेक राजकीय कुटुंबांत पुढच्या पिढीचे राजकारणी एकापेक्षा एक उल्लूमशाल असे निपजत असताना ओमर हे आपल्या तीर्थरूपांपेक्षा अधिक पोक्त, प्रौढ आणि परिपक्वतेच्या दिशेने निघालेले दिसतात ही बाब निश्चितच स्वागतार्ह. जम्मू-काश्मीरच्या विद्यमान मुख्यमंत्र्याविषयी इतकी सकारात्मकता व्यक्त करण्यामागे त्यांचे त्या राज्याच्या विधानसभेतील ताजे भाषण हे एकमेव कारण नाही. शेषत: २०१९ साली त्या राज्याचे विशेष कवच काढून घेतल्यानंतर, त्या राज्यातील व बाहेरीलही अनेक अद्वातद्वा भाषेत आपल्या भावना व्यक्त करत असताना त्यांच्या तुलनेत तरुण ओमर यांचे वर्तन आणि भाषा ही किती तरी आश्वासक होती.

चांगल्या शिक्षणामुळे प्रत्येक इयत्तेत बुद्ध्यांक १ ते ५ गुणांनी वाढू शकतो. एखाद्या मुलाला त्याला शक्य असलेल्या बुद्ध्यांकापर्यंत पोहोचवण्यात अपयशी ठरणारा समाज, त्या मुलाची बौद्धिक उपासमार करत असतो. यावर प्रभावी ठरू शकेल, मूलभूत शिक्षणाचा दर्जा सुधारणे.

# पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ला

काश्मीरमध्ये पहलगाम येथे पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ला हा पूर्वपदावर आलेल्या काश्मिरीयतवर झालेला हल्ला आहे. तिथल्या जीवन, रोजगार आणि देशाशी एकरूप होण्याच्या भूमिकेवर झालेला हल्ला आहे. त्यामुळे त्याचा कठोर कारवाई करूनच निषेध झाला पाहिजे. सरकारने या हल्ल्याला जबाबदार असणाऱ्या प्रत्येक घटकाला जबर किंमत मोजायला लावली पाहिजे.देशाच्या नागरिकांना अशा प्रकारे ठार मारले जात असताना, विरोधी पक्षांसह सर्व जनता या एका मुद्द्यावर सरकारच्या पाठीशी राहील असा मला विश्वास वाटतो.



सरकारच्या याबाबतच्या सर्व कृतींना आपण पाठिंबा व्यक्त करत असताना, त्याच वेळी काही मुद्देही उपस्थित होतात.पहिला मुद्दा हा की अशा हल्ल्यांनंतर सर्वसामान्य जनतेच्या रोषाला सरकारला सामोरे जावे लागते. कारण आपल्या नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यात ते सपशेल अपयशी ठरले आहेत असे जनतेला दिसते. त्यांच्या बड्या बड्या घोषणा हवेत विरून गेलेल्या असतात.जनतेत प्रतिशोधाची व्यापक लहर निर्माण होते आणि ती स्वाभाविक असते. आज ती पाकिस्तानी दहशतवादी गटाबाबत असणे अपेक्षित आहे. तिचा रोख मात्र काश्मीरमधील जनता आणि पुढे पुढे हिंदू- मुस्लीम मुद्द्यावर येऊन ठेपला आहे असे दिसते.

अशा हल्ल्यांनी अस्वस्थ होऊन विरोधी पक्ष सरकारच्या विरोधात अशा भयाण अपयशाबाबत राग व्यक्त करतात. राजीनामे मागतात. विरोधक हल्ल्याचा निषेध करून सरकारला पाठिंबा व्यक्त करत आहेत, तर या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सत्तारूढ म्हणजे सरकारी पक्ष असलेला भाजप आंदोलन करण्याची भाषा वापरत आहे. यामागचे सूत्र अनाकलनीय आहे.कोणताही दहशतवादी हल्ला हे गुप्तचर यंत्रणांचे पूर्ण अपयश मानले जाते. सरकारचे प्रतिनिधी असलेल्या सुरक्षा यंत्रणा त्याआधारे काम करतात.

या पार्श्वभूमीवर तिन्ही सेनादलांचे एकत्रित प्रमुख, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे आणि मोदी शहा यांच्यानंतर सर्वात महत्त्वाचे अजित डोभाल यांची यंत्रणा कमी पडली काय याचा विचार करावा लागेल. लष्कराचे मिलिटरी इंटेलिजन्स, आयबी, रॉ यांचे एजंट्स यांना या हल्ल्याची पूर्वसूचना मिळाली नाही काय याची माहिती मिळाली पाहिजे. त्यांचे हे अपयश जनतेच्या जिवावर उठणारे आहे. त्याची जबाबदारी खोऱ्यातील नियुक्त एजंट्सपासून डोभाल यांच्यापर्यंत सर्वांवर टाकली पाहिजे.काश्मीरमध्ये पहलगाम येथे पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ला हा पूर्वपदावर आलेल्या काश्मिरीयतवर झालेला हल्ला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शेवटची लढाई लढायची वेळ आली!

## रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिंदेंच्या आमदाराचा इशारा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महायुती सरकारमधील रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते आग्रही आहेत. पण जेव्हा पालकमंत्री पदाची यादी जाहीर झाली होती, तेव्हा रायगडचं पालकमंत्री पद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या आदिती तटकरे यांना तर नाशिकचं पालकमंत्री पद भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आलं होतं. मात्र, यानंतर दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थगिती दिली होती.**



त्यानंतर हा तिढा अद्यापही सुटलेला नाही. यातच आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार महेंद्र दळवी यांनी महायुतीला एक सूचक इशारा दिला आहे.'आम्हाला पालकमंत्री पदासाठी शेवटची लढाई लढायची वेळ आली तरी चालेल. आम्ही ती लढाई लढणार', असा इशारा महेंद्र दळवी यांनी दिला आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.मंत्री भरत गोगावले यांची पालकमंत्री पदाची संधी हुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे, असा प्रश्न आमदार महेंद्र दळवी यांना विचारला असता ते म्हणाले, "शिवसैनिक आणि आमदार म्हणून खऱ्या अर्थाने भरत गोगावले यांच्या पालकमंत्री पदासाठी रायगडकरांना अपेक्षा आहे. आदिती तटकरे यांना पालकमंत्री म्हणून घोषित झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या निर्णयाला स्थगिती दिली. आता १ मे रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम रायगडमध्ये आदिती तटकरे यांच्या हस्ते होत आहे. आम्ही याला विरोध करणार आहोत", असं आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटलं आहे."भरत गोगावले यांच्या रुपाने आम्हाला पालकमंत्री पद मिळालं पाहिजे. खरं तर भरत गोगावले यांनी त्याग केलेला आहे. आता त्यांच्याकडे मंत्रिपद आहे, त्यामुळे त्यांना पालकमंत्री पद मिळायला पाहिजे ही अपेक्षा आहे. त्यामुळे रायगडबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल अशी आम्हाला अपेक्षा आहे. खरं तर तटकरे कुटुंबाला संपूर्ण रायगडमधून विरोध आहे. आदिती तटकरे यांच्या पालकमंत्री पदाला स्थगिती मिळालेली आहे, त्यामुळे आम्ही आशावादी आहोत", असंही महेंद्र दळवी यांनी म्हटलं."रायगडने जो जनाधार दिला तो आम्हाला दिलेला आहे. त्यामुळे गोगावले पालकमंत्री व्हायला पाहिजेत. तटकरे कुटुंबाचा इतिहास पाहिला तर त्यांचं नेहमी सर्व आम्हालाच पाहिजे असं असतं. पण आम्ही यावेळी असं स्वीकारणार नाही, मग भलेही यासाठी शेवटची लढाई लढायची वेळ आली तरी चालेल. आम्ही ती लढाई लढणार", असा इशारा महेंद्र दळवी यांनी दिला आहे.महायुतीत शिवसेनेवर अन्याय होतोय का? असं विचारलं असता महेंद्र दळवी म्हणाले, "नाशिक आणि रायगडमध्ये फरक आहे. पण नेहमी तटकरे कुटुंबच का? भरत गोगावले हे सर्वसामान्य व्यक्ती आहेत, पण याचा फायदा कोणी घेत असेल तर रायगडची जनता हे सहन करणार नाही. आम्ही देखील अन्याय सहन करणार नाही. रायगड हा रस्त्यावर उतरणारा मावळा आहे. त्यामुळे आम्हाला काही फरक पडणार नाही. रायगड हा उठाव करणारा जिल्हा असल्यामुळे उठाव तर नक्की होणार", असंही त्यांनी म्हटलं आहे. हा तिढा अद्यापही सुटलेला नाही. यातच आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार महेंद्र दळवी यांनी महायुतीला एक सूचक इशारा दिला आहे.'आम्हाला पालकमंत्री पदासाठी शेवटची लढाई लढायची वेळ आली तरी चालेल. आम्ही ती लढाई लढणार', असा इशारा महेंद्र दळवी यांनी दिला आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.

### आम्ही याला विरोध करणार आहोत

पालकमंत्री पदाची संधी हुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे, असा प्रश्न आमदार महेंद्र दळवी यांना विचारला असता ते म्हणाले, "शिवसैनिक आणि आमदार म्हणून खऱ्या अर्थाने भरत गोगावले यांच्या पालकमंत्री पदासाठी रायगडकरांना अपेक्षा आहे. आदिती तटकरे यांना पालकमंत्री म्हणून घोषित झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या निर्णयाला स्थगिती दिली. आता १ मे रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम रायगडमध्ये आदिती तटकरे यांच्या हस्ते होत आहे. आम्ही याला विरोध करणार आहोत", असं आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटलं आहे.

# बांधकामांच्या ठिकाणी देखरेख उपकरणे नाहीत

## तर बांधकामे थांबवा, उच्च न्यायालयाने महापालिकेला बजावले

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बांधकामांच्या ठिकाणी होणाऱ्या प्रदूषणाची आणि हवेच्या गुणवत्तेची अचूक स्थिती कळण्यासाठी मुंबईतील सर्व बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणांवर प्रदूषण देखरेख उपकरण बसवण्याचे आणि त्याचे पालन न करणारी बांधकामे थांबवण्याचे थेट आदेश जानेवारी महिन्यात देण्यात आले होते. तथापि, एप्रिल महिन्याची अखेर उजाडली तरी या आदेशांचे पालन न केल्याने उच्च न्यायालयाने मंगळवारी मुंबई महानगरपालिकेला फटकारले.**



